FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154157

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे मुंबई Police Station, पहिली खबर क्र. 30 FIR No., वर्ष 2020 Year, दिनांक 30/12/2020 Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-१९८८ कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार Occurrence of offence : Day, तारीख पासून 28/12/2020 Date from, वेळ 12:14 Time, तारीख पर्यंत 28/12/2020 Date to, वेळ 13:47 वा. Time

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख 28/12/2020 Date, वेळ 12:14 Time

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 09/2020 General Diary Reference : Entry No., तारीख 30/12/2020 Date, वेळ 00.30 Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ४ कि.मी./पूर्वेस चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. दादर (पश्चिम)
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव श्री/उत्तर Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर बीएमसी प्रभाग कार्यालय No. if any, गल्ली ... Ward, रस्त्याचे नाव हरिश्चंद्र येवलेमार्ग Name of road

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण प्लाझा सिनेमा Nearest identifiable place, गाव दादर Village, पोस्ट दादर Post, तालुका — Taluka, जिल्हा मुंबई Dist., राज्य महाराष्ट्र -28 State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ... In case, outside the limit of this Police Station, तालुका ... Taluka, जिल्हा — Dist., राज्य ... State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव मोहम्मद इक्बाल शेख उर्फ युसूफ Name
   (b) वडिलांचे / पतीचे नाव अब्दुल करीम शेख Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ५३ वर्षे Date of Birth and Age
   (d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality, फोन नं. ९९६७३३३५४८ Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक — Passport No., दिल्याचा दिनांक — Date of Issue, दिल्याचे ठिकाण — Place of Issue
   (f) व्यवसाय जनरल स्टोअर्स Occupation
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste —, जनजात Sub-Caste —
   (h) पत्ता ... Address : गल्ली / सर्व्हे नं. ९५ Ward, घर / नाव नं. ५९ House/Name No., फोन / मो. नं. ... Phone/Mo. No., पॅन नं. ... PAN No., वोटर्स नं. ... Card No.

   रस्त्याचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण माहीम टॉवर कंपनी Nearest identifiable place, गाव धारावी Village, पोस्ट धारावी Post, पो. स्टे. शाहूनगर P. Stn.

   तालुका — Taluka, जिल्हा मुंबई Dist., राज्य महाराष्ट्र State, सध्याचा पत्ता वरीलप्रमाणे Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   गणेश रमेश बडगे, वय-२७ वर्षे, सध्या राहणार - 303, लक्ष्मी हाईट्स, भंडारवाडा, मालाड (पश्चिम), मुंबई. मुळ राहणार :- दत्तनगर, पाटोदा, जि- बिड

G.P.—800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

POCO
SHOT ON POCO F1

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री ~~केलन~~ ~~मामचंद~~ मोहंम्मद इकबाल अब्दुल करीम
शेख, राही - चाळ नं. 5, खोली नं. 51, बाबासाहेब आंबेडकर रोड,
माटुंगा लेबर कॅम्प, धारावी, मुंबई यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात
आलेला जबाब हि गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात
येत आहे.

समक्ष

30/12/2020
(सुरेंद्र बेलखेडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि., मुंबई

(मोहंमद इकबाल अब्दुल करीम शेख)

FIR ची प्रत मिळाली.

**फिर्याद** दिनांक– ३०/१२/२०२०.

मी मोहम्मद इकबाल अब्दुल करीम शेख उर्फ युसुफ, वय ५३ वर्षे, धंदा– जनरल स्टोअर्सचे दुकान, रा.ठी. चाळ नं.०५, रूम नं.५१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, ए वॉर्ड, मांटुगा लेबर कॅम्प, धारावी, मुंबई – १९ मो.क्र. ९१६७३३३५४६.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझी पत्नी व चार मुलांसह माझे जन्मापासून वास्तव्यास आहे. माझे चाळ क्र. २ येथे स्वतःचे ''गुडलक'' नावाचे जनरल स्टोअर्सचे दुकान आहे तसेच मी मोकळया वेळेत माझे परिसरातील किरकोळ इलेक्ट्रीशियनचे काम देखील करीत असून त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

माझे वर नमूद पत्यावर असलेले घर हे आकाराने २० बाय १० क्षेत्रफळाचे असून त्यास तितक्याच क्षेत्रफळाचा पोटमजला देखील आहे. माझे राहते घर हे जुने असुन मोडकळीस आल्याने ते दुरूस्त करणे आवश्यक असल्याने, मी माझे घराचे दुरूस्तीचे काम सुरू केले. त्यादरम्यान दिनांक १८/१२/२०२० रोजी जी/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (पश्चिम), मुंबई येथील इंजिनिअर श्री. गणेश बडगे व राजीव वाळुंज हे माझे घराचे ठिकाणी आले व सदरचे बांधकाम हे मला बंद करण्याचे सांगून, त्यांचे कार्यालय, जी/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (पश्चिम), मुंबई येथील पहील्या मजल्यावरील रूम नं. ३९ येथे भेटण्यास सांगितले. त्यांनी सांगितल्यावरून मी माझे घराचे दुरूस्तीचे बांधकाम त्वरीत बंद केले.

दिनांक २३/१२/२०२० रोजी सकाळी ११:०० वा. च्या दरम्यान मी जी/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (पश्चिम), मुंबई येथील पहिल्या मजल्यावरील रूम नं. ३९ येथे गेलो असता, तिथे इंजिनिअर श्री. गणेश बडगे हे मला भेटले. त्यावेळी त्यांनी त्यांचे साहेब सध्या कार्यालयात नसल्याचे सांगितल्याने, मी माझे घरी निघून आलो. त्यानंतर त्याचदिवशी सायंकाळी ०४:०० वाच्या सुमारास इंजिनिअर श्री. गणेश बडगे हे मोटार सायकलवरुन माझे घरी आले व मला त्यांच्या मोटार सायकलवर बसवून त्यांचे कार्यालयात घेवून गेले. त्यावेळी सदर ठिकाणी त्यांनी मला त्यांचे साहेबांची ओळख करून देवून हे आमचे साहेब असल्याचे सांगितले. तसेच श्री बडगे यांनी नमूद साहेबांना मी राहत असलेल्या घराचे वाढीव बांधकाम करीत असलेबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी मला बांधकामाची परवानगी घेतली आहे किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना नाही म्हणून सांगितले. त्यावर त्यांनी मला विनापरवाना बांधकाम करण्याकरीता रू. २०,०००/– दयावे लागतील असे सांगितले.

त्यावेळी माझ्या लक्षात आले की, नमूद इंजिनिअर हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत आहेत. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दि. २८/१२/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पो.नि.बेलखेडे यांनी स.पो.आ. आबासाहेब पाटील यांचेशी माझी ओळख करुन दिली. पो.नि. सुरेंद्र बेलखेडे यांनी मला लिहीता वाचता येत नसल्याने श्री. गणेश बडगे व त्यांचे साहेब हे लाचेची मागणी करीत असल्याबाबतची माझी तक्रार माझे सांगणेप्रमाणे त्यांचे संगणकावर मराठीत टंकलिखीत करून त्याची प्रिन्ट काढुन ती मला वाचून दाखविली ती बरोबर असल्याने त्यावर मी माझी सही केली.

त्यानंतर पो.नि. सुरेंद्र बेलखेडे यांनी मला माझे तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पुढील पडताळणी कारवाई करण्यात येणार असलेबाबत सांगून दोन शासकीय पंचांना व पडताळणी पथकाला पाचारण केले. काही वेळाने पोनि बेलखेडे यांनी माझी दोन शासकीय पंचांची ओळख करून दिली. त्यावर पोनि बेलखेडे यांनी पंचांना माझे



POCO
SHOT ON POCO F1
Scanned with CamScanner

तक्रारअर्जासंदर्भात थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि बेलखेडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी वाचून त्यावर स्वाक्षरी करून पोनि बेलखेडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पोनि बेलखेडे यांनी मला पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील असलेल्या बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असल्याचे सांगुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये १६ जीबीचे मेमरी कार्ड असल्याचे सांगुन त्यामध्ये माझे व लोकसेवक यांच्यातील होणारे संभाषण रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्याप्रमाणे पो.नि. बेलखेडे व स.पो.आ. पाटील यांनी चर्चा करुन श्री. बडगे हे कार्यालयात आहेत किंवा कसे? याची खात्री करण्याकरीता त्यांचे मोबाईलवर फोन करुन व सदरचा कॉल रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्याप्रमाणे मी माझा मोबाईल वरुन श्री. बडगे यांच्या मोबाईल वर कॉल केला असता, त्यांनी त्यांचे कार्यालयात लवकर येण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी, दोन पंच, पोलीस पथकासह कारवाईकरीता रवाना झालो.

त्यानंतर जी/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (प.) कार्यालयाच्या इमारतीपासुन थोडया अंतरावर वाहन उभे करुन पो.नि.बेलखेडे यांनी पडताळणीबाबतच्या सर्व सुचना दिल्या व माझ्या शर्टाच्या आतील बनियानला डिजीटल रेकॉर्डर लावून पंच श्री. कोळी यांचेसह इंजिनिअर गणेश बडगे यांची भेट घेण्याकरीता पाठविले.

त्यानंतर आम्ही जी/नॉर्थ विभागाच्या पहिल्या मजल्यावरील रुम नं. ३९ मध्ये गेलो. तेथे इंजिनिअर बडगे यांचेशी भेट झाली. त्यावेळी मी त्यांना माझ्या घरावर करण्यात येणाऱ्या कारवाईबद्दल विचारले असता, त्यांनी त्यांचे साहेब सुट्टीवर असुन माझे घराचे बांधकामावर कारवाई न करण्याकरीता त्यांचे मोबाईलमधील कॅलक्युलेटर उघडुन त्यावर २५ असा आकडा लिहुन रु. २५,०००/— दयावे लागतील असे मला पंचासमक्ष दाखविले. त्यावर मी बडगे साहेब यांना रक्कम कमी करण्याबाबत विनवणी केली असता, त्यांनी पुन्हा मोबाईलचे कॅलक्युलेटर उघडुन २० असा आकडा लिहुन रु. २०,०००/— दयावे लागतील असे सांगितले. त्यावर मी आणखी थोडेफार कमी कारण्याबाबत विनवणी केली असता, त्यावर त्यांनी " बघा होत असेल ठिकय नसेल तर कंम्प्लेंट आलीय अॅक्शन घ्यावी लागेल...सिम्पल गोष्ट आहे...त्याच्यापेक्षा डबल टिबल लॉस होईल..." असे सांगितले. तसेच संध्याकाळी ५:३० वा. पर्यंत कार्यालयात रु. २०,०००/— इतकी रक्कम घेवुन येण्यास सांगितले.

त्यानंतर मी पंचासह पोलीस पथकाजवळ आलो. पो.नि. बेलखेडे यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजुस बनियानला लावलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्ड काढुन तो बंद केला. त्यानंतर सदरची हकिकत स.पो.आ. पाटील व पो.नि. बेलखेडे यांना सांगितली. त्यानंतर स.पो.आ. पाटील व पो.नि.बेलखेडे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्ड चालु करुन श्री. बडगे व माझ्यात झालेले संभाषण ऐकुण लाचेच्या पैश्याची मागणी झाली असल्याची खात्री केली.

त्यानंतर श्री. बडगे यांना लाचेची ठरलेली रक्कम रु. २०,०००/— देण्याकरीता जावयाचे असल्याने मी माझे स्वत:च्या बचतीतुन आणलेली रक्कम रु. २०,०००/— पो.नि. बेलखेडे यांचेकडे दिली. त्यानंतर पो. नि. बेलखेडे यांनी सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. तसेच श्री. बडगे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर श्री. बडगे यांच्या रुमच्या बाहेर येवुन उजव्या हाताने केसावर हात फिरवुन सापळा पथकास इशारा देण्याबाबत

समक्ष

30/12/2020
(पोनि ... ला.प्र.वि. मुंबई)

30/12/2020



Scanned with CamScanner

सुचना दिली. त्यानंतर पो.नि. बेलखेडे यांनी मला पांढऱ्या रंगाची पावडर दाखवुन ती अँथ्रासिन पावडर असल्याचे सांगितले. तसेच ती पावडर रु. २०,०००/– च्या रकमेला लावायची असल्याचे सांगुन त्या पावडरचे मला गुणधर्म सांगितले. त्यानंतर मी दिलेल्या पैश्यांना पोलीसांनी अँथ्रासिन पावडर लावुन सदरची रक्कम माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या पुढच्या खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि. बेलखेडे यांनी माझ्या शर्टाच्या आतील बनियानला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर लावुन तो चालु केला. त्यानंतर मी पंचासह श्री.बडगे यांच्या कार्यालयात रवाना झालो.

इंजिनियर श्री.बडगे यांच्या कार्यालयात गेलो असता सायंकाळचे सहा वाजले असल्याने श्री. बडगे यांचे कार्यालय बंद असल्याचे दिसुन आले. त्यामुळे मी पंचासह पोलीस पथकाजवळ परत आलो. पो.नि. बेलखेडे यांनी माझेकडील डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन घडलेली हकीकत विचारली असता, मी वरीलप्रमाणे सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर श्री. बडगे यांना फोन करुन त्यांच्या कार्यालयात आलो असल्याबाबत सांगुन सदरचा कॉल रेकॉर्डींग करणार असल्याची सुचना पो.नि. बेलखेडे यांनी दिली. त्यानुसार मी माझे मोबाईलवरुन श्री.बडगे यांना फोन केला असता, त्यांनी दि. २९/१२/२०२० रोजी सायंकाळी ०४:०० वाजेपर्यंत कार्यालयात येण्याबाबत सांगितले. सदरचा कॉल पोलीसांनी रेकॉर्ड केला. त्यानंतर कारवाई स्थगित करण्यात येत असल्याचे सांगुन आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो व पडताळणी कारवाई पुर्ण झाल्यानंतर दि. २९/१२/२०२० रोजी १०:०० वा ला.प्र.वि. कार्यालयात मला व पंचांना हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दि. २९/१२/२०२० रोजी सकाळी ११:०० वा दरम्यान ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. त्यावेळी मला पो.नि. बेलखेडे यांनी श्री. बडगे यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन ते कार्यालयात असल्याचे खात्री करुन सदरचा कॉल रेकॉर्डींग करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी पंचासमक्ष श्री. बडगे यांना माझे मोबाईलवरुन फोन लावला असता त्यांनी ते कार्यालयात हजर असुन मला त्यांच्या कार्यालयात येण्याबाबत सांगितले. सदरचा कॉल पोलीसांनी रेकॉर्डींग केला आहे. त्याप्रमाणे मी, दोन पंच, पोलीस पथकासह कारवाईकरीता रवाना झालो.

त्यानंतर जी/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाच्या इमारतीपासुन थोडया अंतरावर वाहन उभे करुन पो.नि.बेलखेडे यांनी कारवाईबाबतच्या सर्व सुचना दिल्या व माझ्या शर्टाच्या आतील बनियानला डिजीटल रेकॉर्डर लावून पंच श्री. कोळी यांचेसह इंजिनिअर गणेश बडगे यांना भेटण्याकरीता पाठविले. श्री. बडगे यांना त्यांच्या पहिल्या मजल्यावरील रुम क्र. ३९ मध्ये जावुन भेटलो असता, त्यांनी मला त्यांच्या टेबलाच्या बाजुला असलेल्या नमन कराणीया, सहायक अभियंता यांचे कक्षात घेवुन गेले व माझेकडुन लाचेची रु. २०,०००/– इतकी रक्कम स्विकारली. त्यानंतर श्री. बडगे हे रुम क्र. ३९ च्या बाहेर येवुन उजव्या बाजुस असलेल्या बाथरुममध्ये गेले असता मी सुद्धा त्यांच्या पाठोपाठ गेलो. श्री. बडगे हे बाथरुममधुन बाहेर व्हरांडयात आल्यानंतर मी पोलीस पथकास उजव्या हाताने केसावरुन हात फिरवुन इशारा केला. यावेळी पोलीसांनी तात्काळ श्री.बडगे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

तरी यातील इंजिनिअर श्री. गणेश रमेश बडगे यांनी दिनांक १८/१२/२०२० रोजी माझ्या घराच्या दुरुस्तीचे बांधकाम बंद करावयास सांगुन दिनांक २३/१२/२०२० रोजी मला त्यांच्या कार्यालयात मोटार सायकलवर घेवुन जावुन त्यांच्या साहेबांनी माझ्याकडे मी रहात असलेल्या घराचे दुरुस्तीचे बांधकामावर कारवाई न करण्याकरीता रु. २०,०००/– इतक्या रकमेची मागणी केली. त्यानंतर दिनांक २८/१२/२०२० रोजी इंजिनिअर गणेश बडगे यांनी रु. २५,०००/– इतकी लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. २०,०००/–



POCO
SHOT ON POCO F1
Scanned with CamScanner

स्विकारण्याचे मान्य केले व दिनांक २९/१२/२०२० रोजी पंचासमक्ष रु. २०,०००/– इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी इंजिनिअर श्री. गणेश बडगे यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझे इंजिनिअर श्री. गणेश बडगे, जी/नॉर्थ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (प.) मुंबई यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला मराठीत वाचुन व समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

30/12/2020

( सुरेंद्र येलखेडे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

30/12/2020



Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ……… तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ……… –

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ……… –

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे यांच्या मोडकळीस आलेल्या घराचे वाढीव दुरुस्तीचे काम करीत असताना यातील आरोपीत लोकसेवक यांनी सदरचे काम बंद करुन फिर्यादिस यांचे कार्यालयात घेवून जावून वाढीव बांधकामावर कारवाई न करण्याकरीता २०,०००/- रुपयाची लाचेची मागणी करुन फिर्यादी यांचेकडून २०,०००/- रुपयाची रक्कम लाच म्हणून स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही –** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

सुरेंद्र बेलखेडे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

………… –

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ……… – ………, जिल्हा ……… – ………, राज्य ……… – ………

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)……………… Rank……………… No……………… to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to……………………………… (3) Transferred to P. S. ………………………… District……………………………… on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. – होय

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature] ३/१२/२०२०

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुरेंद्र गोपाळराव बेलखेडे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ………………

Posting

Code No. of I. O. ………………

INSPECTOR OF ... ANTI CORRUPTION BUREAU

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 30/12/2020

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner